# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 17 June 2024

## Time: 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## **आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

## **प्रादेशिक बातम्या**

## **दिनांक: १७ जून २०२४ दुपारी १.०० वा.**

****

पश्चिम बंगालमधल्या दार्जिलिंग जिल्ह्यात रंगापानी रेल्वे स्थानकाजवळ कंचनजंगा एक्सप्रेस रेल्वेला मालगाडीची धडक लागून एक्सप्रेसचे काही डबे रुळावरुन घसरले. यात पाच जणांचा मृत्यू झाला असून, अनेक जण जखमी झाले. घटनास्थळी बचावकार्य सुरु आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. पंतप्रधान मोदी यांनी मृतांच्या वारसांना पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून दोन लाख, तर जखमींना ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.

****

येत्या २१ जून रोजी साजरा होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची तयारी जगभरात मोठ्या उत्साहात सुरु आहे. यानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भद्रासनावरील एक चित्रफित सामाजिक माध्यमांवर सामायिक केली आहे. भद्रासनाचा सराव केल्याने सांधे मजबूत होतात, गुडघेदुखी कमी होते, पोटाच्या समस्या दूर ठेवण्यासाठी देखील हे आसन उपयुक्त असून, याचा सर्वांनी सराव करण्याचं आवाहन पंतप्रधानांनी केलं आहे.

दरम्यान, सलग तिसऱ्या कार्यकाळासाठी पदाची शपथ घेतल्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आकाशवाणीवरच्या 'मन की बात' या कार्यक्रमाच्या १११व्या भागात या महिन्याच्या अखेरच्या रविवारी, येत्या ३० जूनला देशवासियांशी संवाद साधणार आहेत.

****

'अग्निपथ योजना' काही बदलांसह पुन्हा सुरू करण्याचं वृत्त केंद्र सरकारने फेटाळून लावलं असून, असा कोणताही निर्णय घेतला नसल्याचं स्पष्ट केलं आहे. तसंच, समाजमाध्यमांवर फिरत असलेले संदेश दिशाभूल करणारे आणि बनावट असल्याचं पत्रसूचना कार्यालयानं म्हटलं आहे.

****

येत्या २९ जून पासून सुरू होणाऱ्या अमरनाथ यात्रेसाठी हेलिकॉप्टर सुविधेच्या नोंदणीला प्रारंभ करण्यात आला आहे. बालताल आणि पहालगाम या दोन्ही ठिकाणांवर ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अमरनाथ यात्रेच्या जे के एस ए एस बी डॉट एनआयसी डॉट इन या अधिकृत संकेतस्थळावरून यासाठी नोंदणी करण्यात येईल.

****

जालना जिल्ह्यातल्या आंतरवाली सराटी इथं इतर मागास प्रवर्ग – ओबीसी आरक्षणासंदर्भात ओबीसी नेते लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांचं उपोषण सुरु आहे. सरकारच्या शिष्टमंडळानं आज उपोषणस्थळी आंदोलनकर्त्यांची भेट घेऊन चर्चा केली. या शिष्टमंडळात छत्रपती संभाजीनगरचे खासदार संदीपान भुमरे, माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भागवत कराड आणि जालना जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांचा समावेश आहे. या नेत्यांनी आंदोलनकर्त्यांना उद्या मुंबईत होणाऱ्या मंत्रिमंडळाच्या बैठकीला येण्याची विनंती केली. मात्र जो पर्यंत राज्य शासनाकडून लेखी आश्वासन मिळत नाही तोपर्यंत उपोषण न सोडण्याचा निर्धार हाके आणि वाघमारे यांनी व्यक्त केला असून, त्यांच्यातर्फे पाच सदस्यीय शिष्टमंडळ उद्याच्या बैठकीला उपस्थित राहील, असं सांगितलं.

****

आठ लाखापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबातल्या मुलींना मोफत शिक्षण देण्याची राज्य शासनाची योजना असून, याबाबतचा शासन आदेश लवकरच जारी करण्यात येईल, असं विश्वास उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केला आहे. ते काल पुण्यात एका कार्यक्रमात बोलत होते.

दरम्यान, या योजनेसंदर्भात सरकारने केवळ घोषणा केली असून, अंमलबजावणी झाली नसल्याची टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे. मंत्र्यांनी ही घोषणा केल्यामुळे गांभीर्य आहे, तसंच विद्यार्थी, पालक आणि महाविद्यालयांमध्येही संभ्रमाचं वातावरण असल्याचं सुळे यांनी ट्विट संदेशात म्हटलं आहे.

****

१८व्या `मिफ' अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा आज तिसरा दिवस आहे. `सामाजिक परिवर्तनासाठी माहितीपटांची ताकद' या विषयावरचा परिसंवाद आज या महोत्सवात घेण्यात आला. यावेळी डी. रामकृष्णन यांनी, समांतर चित्रपटसृष्टीतले विख्यात दिग्दर्शक टी. एस. नागभरण यांची मुलाखत घेतली.

****

पुणे जिल्ह्यातल्या विविध तालुक्यांमधल्या पारंपरिक दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची आवश्यकता असून, यासाठी बैठक घेण्याची मागणी खासदार शरद पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे. यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिलं आहे.

****

धाराशिव इथल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उप परिसरात चौथ्या धाराशिव नाट्यमहोत्सवाचं उद्धाटन आज विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. अंकुश कदम यांच्या हस्ते झालं. यावेळी मान्यवरांनी नाट्यशास्त्र आणि लोककला विभागातल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलं.

****

टी - ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज बांग्लादेशनं नेपाळचा २१ धावांनी, तर श्रीलंकेनं नेदरलँड्सचा ८३ धावांनी पराभव केला. आज या स्पर्धेत न्यूझीलंड आणि पापुआ न्यू गीनी यांच्यात सामना होणार आहे.

****